शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या इतर सहकारी संस्था सहकारी खरेदी विक्री संघ, बाजार समिती, सहकारी सुतगिरण्या, सहकारी पतपेढ्या व नागरी बँकांचे जाळे विणले गेले. ग्रामीण भागामध्ये शैक्षणिक संस्था. दळणवळणाची साधणे, पाणी, वीज, रस्ते अशा मुलभूत सोयी सुविधा निर्माण झाल्या आणि एकंदर ग्रामीण विकासाला चालना मिळाली.

## समारोप

अर्थात या सर्व श्रेयाचे मानकरी होते ते यशवंतराव चव्हाण. त्यामुळेच सहकारी चळवळीच्या वाढीला डॉ. धनंजयराव गाडगीळ पद्मश्री डॉ. विखे पाटील, वसंतदादा पाटील, तात्यासाहेब कोरे, यशवंतराव मोहिते, रत्नाप्पा आण्णा कुंभार आदींनी आपापल्या भागात सहकाराचे हे जाळे अधिक पक्के केले. अनेक धाडसी प्रयोग केले. या सहकारी चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या व सर्व सामान्यांच्या दारात विकासाची गंगा पोहचवली.

## संदर्भ

१. यशवंतराव चव्हाण : कृष्णाकाठ आत्मचरित्र

Scanned with OKEN Scanner

Daulat Vishwastha Sanstha's

# Yashwantrao Chavan Mahavidyalaya, Halkarni

Tal.Chandgad, Dist. Kolhapur : 416 552
email : yccggvp89@gmail.com
www.yashguru.edu.in
NAAC Accredited: 'A' Grade




## National Conference

# Yashwantrao Chavan Architect of Modern Maharashtra

**Proceeding Issue**
**18 March, 2023**

Scanned with OKEN Scanner

## अनुक्रम....


संपादकीय ३

१. यशवंतराव आणि महाराष्ट्र / प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण ५

२. यशवंतराव चव्हाण : रक्षा, गृह, अर्थ और विदेश नीतिकार
प्रा. शिवाजी निंगोजी खरुजकर १२

३. यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार / डॉ. सरला आरबोळे १९

४. यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान
प्रा. अशोक आलगोंडी २४

५. आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणातील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका
डॉ. ज्योती जयवंत व्हटकर २९

६. साहित्यप्रेमी : यशवंतराव चव्हाण / प्रा. वंदना शामराव खोराटे ३४

७. यशवंतराव चव्हाणांचे लोकशाही विषयक विचार / प्रा. ए. डी. कांबळे ४०

८. यशवंतराव चव्हाण यांचे दिशादर्शक धोरण / प्रा. डॉ. शीला देशमुख ४४

९. यशवंतराव चव्हाण यांचे अर्थकारण / डॉ. जे. पी. पाटील ४९

१०. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमधील यशवंतराव चव्हाणांचे योगदान
श्री. गोविंद मारुती अंबी ५६

११. यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार / प्रा.जी.पी. कांबळे ६३

१२. सहकाराचे प्रणेते : यशवंतराव चव्हाण / प्रा. जी.जे. गावडे ६६

१३. यशवंतरावांचा पत्रसंग्रह 'विदेश दर्शन' / वंदना गोविंद केळकर ६९

१४. यशवंतराव चव्हाण यांच्या आठवणी / प्रा. संगीता किरण लोखंडे ७४

15. Role of Yashwantrao Chavan in Agricultural Development of
Maharashtra / Dr. D. G. Chighalikar 76

16. Role of Reading in Molding The Personality of Yashwantrao
Chavan / Dr. Sunanda S. Shelake 79

17. Yashwantrao Chavan : Architect of Modern Maharashtra
Dr. M. V. Jadhav & Prof. V. V. Kolkar 84

18. The Triumphant Visionary is his Name / Heramb R. Gadgil 92

१९. यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण आणि शेती विषयक विचार / प्रा. जयंत घाटगे ९७

२०. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे राष्ट्रबांधणीतील योगदान
डॉ. सुरेश मारूती चव्हाण १०२

२१. आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते / डॉ. मनोहर सुबराव कोळसेकर १०८

22. Thoughts of Yashwantrao Chavan
Shripad Sunil Tate & Dr. A. A. Patil 113

२३. यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक कार्य / श्री. राजू वैजनाथ चिंचणगी ११९


Scanned with OKEN Scanner

# यशवंतरावांचा पत्रसंग्रह 'विदेश दर्शन'

केळकर वंदना गोविंद

ग्रंथपाल, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी ता. चंदगड, जि. कोल्हापूर

## प्रास्ताविक

शेती, कला, क्रीडा, सहकार, उद्योग आदी क्षेत्रांना नवीन दिशा देणारे यशवंतराव चव्हाण पुरोगामी विचारसरणी मनात बाळगून संघटक, प्रशासक, समीक्षक, प्रसंगी कार्यकर्ता अशा अनेक भूमिका त्यांनी निभावल्या, महाराष्ट्र घडविला. त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हंटले जाते.

राजकारणी म्हणून ते सर्वांना ज्ञात असले तरी ते उत्तम साहित्यिक होते. यशवंतरावांनी स्वतःचा वैचारिक व साहित्यिक पिंड वाचनातून घडविला. विविध विषयावरील पुस्तके ते वाचनासाठी निवडत. दिवस भर काम केल्यानंतरही रात्री तास दिड तास वाचन केल्याशिवाय झोपत नसत. दिवसाही सवड मिळेल तेव्हा ते वाचन करीत. राजकारणातून सृजनात्मक लेखनासाठी पुरेसा वेळ देता आला नाही तरी त्यांच्या उपलब्ध साहित्यातून कृष्णाकाठ (आत्मचरित्र), ऋणानुबंध (आत्मपर लेख संग्रह), भूमिका, सहयाद्रीचे वारे, युगांतर (भाषण संग्रह) विदेश दर्शन, विरंगुळा (पत्रसंग्रह) या ग्रंथातून एक प्रतिभाशाली लेखक आपल्याला भेटतो. प्रसिध्द कादंबरीकार ना. सी. फडके त्यांच्या बद्दल 'यशवंतराव राजकारणात न पडते तर मराठीला एक समर्थ लेखक लाभला असता' असे उद्गार काढतात. त्यांच्या विदेश दर्शन या पत्रसंग्रहाचा परिचय आपण या ठिकाणी करून घेणार आहोत.

## विदेश दर्शन पत्रसंग्रह

पत्र व्यवहाराचे स्वरूप हे पूर्णतः व्यक्तिगत स्वरूपाचे असते. मनातील गोष्ट सांगणे, कामाचे स्वरूप विशद करणे, पुर्णतः वैयक्तिक लेखन असे सामान्यतः पत्र व्यवहाराचे स्वरूप असते.

''पत्र की कलात्मकता ही उसे साहित्यिक सिंहासन पर बैठा देती है। देश – काल की परिस्थिती, प्रवृत्तीयाँ और इतिहास का ज्ञान भी उसके पत्रों के माध्यम से होता है'' हे विधान यशवंतरावांच्या विदेश दर्शन या पत्र संग्रहास तंतोतंत लागू पडते.[१] ही पत्रे त्यांनी पत्नी वेणूताई यांना लिहिली आहेत. ही पत्रे केवळ खुशालीसाठी लिहिलेली



Scanned with OKEN Scanner

नाहीत. त्यामध्ये वैयक्तिक स्वरूपाचा उल्लेख क्वचित आढळतो. या पत्रातून आपल्याला विदेश दर्शन घडते. हा एक तऱ्हेची पृथ्वी प्रदक्षिणाच आहे. विदेश, दर्शनमधून यशवंतरावांनी लिहिलेली पत्रे रामभाऊ जोशी यांनी संपादित केली आहेत. भारताच्या केंद्र सरकाराचे संरक्षण मंत्री, अर्थमंत्री, विदेशमंत्री या नात्याने त्यांनी विदेशयात्रा केली. आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका आणि अन्य द्विपे या ठिकाणी यशवंतरावांनी प्रवास केला. नोव्हेंबर १९६३ ते जानेवारी १९७७ एवढया दीर्घकालात विस्तारलेला हा ९७ पत्रांचा संग्रह आहे. प्रवासवर्णनाचा आकृतिबंध या पत्रसंग्रहास प्राप्त झाला आहे.

प्रवासात जे पाहिले, अनुभव घेतला त्याचे वर्णन प्रवासवर्णनामध्ये असते. पाहिलेले स्थळ प्रसंग मानवी मनात राहतात. त्यांचे वर्णन शब्दबध्द करीत असताना त्याच्या व्यक्तिमत्वाचा, संवेदनशीलतेचा समोवश त्या लेखनात जेव्हा आपल्याला जाणवतो. तेव्हा ते प्रवासवर्णन वाचनीय होते. प्रसिध्दी पाव्हने गंगाधर गाडगीळांनी लिहिलेले 'गोपुरांच्या प्रदेशात' हे एक आदर्श प्रवासवर्णन आहे. यशवंतरावांनी प्रवासवर्णन लेखनासाठी पत्रांचा आधार घेतला आहे.

हा यशवंतराव व वेणूताई यांच्यातील पत्रव्यवहार आहे. वेणूताईची प्रकृती नेहमी अस्वस्थ असे. विविध कारणांनी यशवंतरावांनी जो परदेश प्रवास केला. त्यामधील सुंदर स्थळे निव्वळ प्रकृती ठीक नसल्यामुळे त्या पाहू शकत नसत. याची खंत नेहमीच यशवंतरावांना वाटे. यशवंरावांच्या जीवनात वेणूताई सखीच्या भूमिकेत वावरत ते म्हणतात मला वाटते तू निर्धाराने हे प्रवास करण्याची तयारी केली पाहिजेस प्रकृतीची कथा तर नेहमीचीच आहे. मी तेथे नसलो म्हणजे मी तेथे नसलो म्हणजे त्यामुळेच एकाकीपणाचे भावनेतून तू आजारी पडतेस. त्या पेक्षा बरोबर राहून काहीसा त्रास झाला तरी त्याची तीव्रता कमीच भासेल (व्हीएन्ना २२ एप्रिल १९७२) घरी असताना पूर्णत: वेणूताईच्यावर आपण अवलंबून असल्याची कबूली यशवंतराव पत्रातून देतात. प्रवासातील एकाकीपणा दूर करणे व पत्नीला सहप्रवासाचा आनंद देण्यासाठी यशवंतरावांनी ही पत्रे लिहिली आहेत.[२]

विशिष्ट मंत्रीपदाच्या गरजे प्रमाणे, विदेशातील उच्च पदस्थ, प्रथितयश लोकांबरोबर त्यांनी चर्चा केली. भारताच्या हीताचे कोण? विरोधी कोण? बाहेरून पाठींबा देणारे कोण? याची पूर्ण:त नोद त्यांनी या पत्रांमधून घेतली आहे. अनेक महनीय व्यक्तीबरोबर झालेली चर्चा, प्रकट भाषणे झालेली शब्दाशब्दी, जुन्या घटनांचा अन्वयार्थ याची पूर्णतः नोंद त्यांनी पत्रातून घेतलेली दिसते. त्याची समीक्षाही ते करतात. पण त्यांनी



आपला सुसंस्कृतपणा कोठेही सोडलेला नाही. आंतराष्ट्रीय राजकारणाचे पट्टीचे मुत्सद्दी किसिंजर यांच्या संबंधी ते लिहितात डॉ किसिंजर मला तरी मोकळा, स्पष्ट आणि हिंदुस्थानशी चांगले संबंध रहावेत अशी खरीखुरी इच्छा असलेला गृहस्थ त्याच्या बोलण्यावरून वाटला. मध्यंतरीच्या वादळामुळे त्याच्या मनात काही किंतू असेल अशी शंका मला होती. परंतु तसे जाणवले नाही.[३] (न्यूयॉर्क ते लंडन प्रवास ११ आक्टोबर १९७५)

ते जेथे जातात तेथील विशिष्ट समाजादर्शन, प्रदेशाचा निसर्ग, प्रदेशाचा इतिहास त्यांच्या पत्रातून आपल्या डोळयासमोर उभा राहतो. त्या प्रदेशाची नैसर्गिक विविधता सर्व ऐतिहासिक विशेष त्यांच्या पत्र व्यवहारात बिनचूक टिपलेले आपल्याला पहायला मिळतात. लंडनमध्ये स्ट्रॅटफर्ड महाकवी व नाटककार शेक्सपिअरच्या जन्मगावाला त्यांनी दिलेली भेट (लंडन १५ नोव्हेंबर १९६९), उझबेकी भाषेतील ऐतिहासिक प्रेमकथेवर आधारलेले नाटकाचे संगीत, ताश्कंद जानेवारी लिमोसोल येथील मदिरोत्सव या मदिरोत्सवाच्या चांदण्या रात्रीस त्यांनी दिलेले 'यौवन पौर्णिमा' हे नाव, (कोपनहेगन २० सप्टेबर १९७०) पॅरिसच्या राजवाडयाचे सूर्याच्या कोवळया किरणस्पर्शाबरोबर घडलेले हृदयंगम दृश्य पाहाताना त्यांना पंडित रविशंकर यांच्या मालकंस रागाची आठवण करून देते व यक्ष किन्नरांच्या भूमिकेत घेऊन जाते (पॅरिस १९ सप्टेंबर १९७१) युरोपमध्ये त्यांनी पाहिलेला ऑपेरा, गाण्याचे शब्द आणि कथा इटालियन असलेला २५०० माणसे बसू शकतील अशी बैठक व्यवस्था (व्हीएना २२ एप्रिल १९७२), जगप्रसिध्द सर्वांत मोठी सेंट लॉरेन्स नदी. या नदीच्या काठी घेतलेला चालण्याचा दोन मैलाचा अनुभव त्यांना बालपण व युवावस्था यांची आठवण करून देतो (क्विबेक २७ सप्टेंबर १९७४) बमीयानच्या खोऱ्यात चेंगीझखानाने केलेला बुध्दमूर्तीचा विध्वंस पाहून पुरूषार्थ करणाऱ्यांनी करूणेचाच मार्ग पत्करला पाहिजे, या निष्कर्षाप्रत ते येतात (काबूल ३१ आक्टोबर १९७५) Equus हे ब्रॉडवेवर पाहिलेले नाटक, त्याची नोंदविलेली निरीक्षणे (न्यूयॉर्क ३१ ऑगस्ट १९७५) बाली बेटावरील हिंदू संस्कृतीचे दर्शन अशी अनेक उदाहरणे त्यांच्या रसिकतेची विद्वतेची, सौदर्यदृष्टीची, सूक्ष्मनिरीक्षण शक्तीचा प्रत्यय देतात. कोणतीही भाषा, संस्कृती, कलाकृती, संगीत त्यांच्या रसिकेतला वर्ज्य नव्हते हेच त्यांच्या पत्राच्या अभ्यासावरून स्पष्ट होते.

सर्व वाड्मय प्रकार हाताळणारे ते पुस्तकप्रेमी, साहित्यप्रेमी रसिक होते. कोणत्याही शहरात गेले की, तेथे न चुकता तीन स्थळांना ते भेट देत असत. वस्तुसंग्रहालय,

पुस्तकाचे दुकान आणि नाटयमंदीर. कामाची कागदपत्रे वाचून ते टिपणे काढून ठेवीत. मन प्रसन्न करणारे पेय चहा. त्याचा आस्वाद घेत ते प्रवासात वाचन करीत. लंडनमधील बुक शॉपला भेट देतात व पुस्तके पाहून परत येतात. खरेदी करण्याची शक्यता नाहीच असे त्यांना वाटते. (लंडन २० सप्टेबर १९७२) लाकडात कोरलेली सुंदर कलाकृती पाहून रामराम म्हणतात. किंमत पाहून अवाक होतात (वॉशिंग्टन ३० जुलै १९७३) असोसिएशन ऑफ आर्ट केंद्रावरील अनेकविध चित्रे पाहून ते लिहितात पाय निघत नव्हता आणि खीसा रिकामा होता (न्यूयॉर्क २ आक्टोबर १९७५) मनात आणले तर कोणतीही वस्तू ते बिनधास्त खरेदी करू शकले असते. पण त्यांची स्वच्छ व निस्वार्थी राजकारणी ही प्रतिमा या ठिकाणी अधोरेखित होते.

न्यूयॉर्क, जर्मनी येथील पुस्तकांच्या दुकानांना त्यांनी भेटी दिल्याच्या नोंदी पत्रात आढळतात. (कौललांपूर) हिलटन २६ एप्रिल १९७४ पत्र क्रमांक ३१ पूर्णत: त्यांच्या वाचन पध्दती, त्यांची विचार करण्याची पध्दती यावर प्रकाश टाकते. ते म्हणतात, परवा येथे येताना मी अगदी शेवटच्या घटकेला वाचण्यासाठी जे पुस्तक उचलले ते मी बरेच दिवस राखून ठेवले होते. आवडीने खावयाचा पदार्थ जसा चाखून माखून खावा शेलकी चांगली वस्तू जशी राखून सावरून वापरावी तसे हे पुस्तक थांबत थांबत त्याची रूची घेत सावकाशीत वाचावे. असे ठरविले होते प्रवासाला जाताना ते पुस्तक बरोबर घेऊन जात.[४]

विदेशमंत्री म्हणून परदेश दौऱ्यावर असताना भारतीय राजकारणतील यशवंतरावांचे स्थान त्या विषयीचे त्यांचे विचार पत्र क्रमांक ५३ (मॉटगो बे (जमैका) ४ मे १९७५) या पत्रात उल्लेख केले आहेत. त्यावेळी ते ६२ वर्षाचे होते. त्यांनी अनेक सत्तास्थाने भोगली. नावलौकिक मिळविला. राज्यात केंद्रात पण सत्तेसाठी कुणाच्याही मागे लाचारीने कधी लागलो नाही. याची स्पष्ट कबूली ते देतात. सामाजिक न्याय, दलितांबद्दल कणव यासाठीच त्यांनी योजना आखल्या. सत्तेसाठी साधन सुचितेचा कसलाही विचार न करणारी अनेक माणसे पाहिली की त्यांचे मन दुःखी होत असे. अवमानीत होण्याचे अनेक प्रसंग आले पण ते मनाची समजूत घालतात. मी माझी समजूत घालतो की नाही असा वैयक्तिक भावनांचा विचार करून निर्णय घ्यावयाचे नसतात. राष्ट्रीय कार्य करीत असताना स्वतःला विसरले पाहिजे भविष्याकडे लक्ष ठेवले पाहिजे. रागाने मोडता येते, जोडता येत नाही. तडजोडीने वागले पाहिजे. असा विचार करून मग काम चालू राहते.[५] हे एका स्वच्छ व निस्वार्थी राजकारणी यशवंतरावांचे विचार आजच्या राजकारणी माणसांना एक वस्तूपाठ आहेत.



नेहमी कार्यमग्न असणारे यशवंतराव उजवीकडे किंवा डावीकडे पहायला जागा नाही अशी परिस्थिती या वाक्याच्या उल्लेखातून जाणवतात. रोम मधील रविवारी व सुटीच्या दिवशी पेट्रोलचा वापर बंद पेट्रोल पंप बंद. स्त्री, पुरूष मुले सायकलवरून रपेट करताना आढळतात. हा १९७४ मध्ये इटलीने घेतलेला निर्णय आपण आज ही आमलात आणू शकलो नाही. या नोंदीमागे यशवंतरावांची दूरदृष्टी लक्षात येते (इटली जानेवारी १९७४)

अशा तऱ्हेचे लेखन यशवंतरावांनी जी सत्तास्थाने भूषविली त्या स्थानावरील कोणत्याही भारतीय व्यक्तीने केलेले नाही. त्यांचे तात्विक चिंतन, साहित्यकुशल वृत्ती, सूक्ष्म निरीक्षण या लेखनातून प्रतित होते. हे एक विचारधन आहे. प्रवासात क्वचित येणाऱ्या अनुभूतीची शब्दांनी बांधणी करावी म्हणून त्यांनी हे प्रदीर्घ लेखन केले आहे. या पत्रांना पती पत्नीमधील पत्रव्यवहार असे स्वरूप न राहता, या पत्रांना ऐतिहासिक व सामाजिक संदर्भ लाभला आहे. पत्रातून यशवंतरावांचे निसर्गप्रेम, रसिकता, पुस्तकांवरील प्रेम, सतत कार्यमग्न राहण्याची वृत्ती, राजकीय टिका टीप्पणी अशा अनेकविध अर्थाने विदेश दर्शन या पुस्तकातील पत्रे संस्मरणीय आहेत. हा पत्रसंग्रह भारतीयांसाठी यशवंतरावांनी दिलेली ऐतिहासिक देणगी आहे.

**संदर्भ**


१. मजदा, असद : १९९० गद्य के विविध रूप. नयी दिल्ली, ग्रंथ अकादमी पृष्ठ क्रमांक २३

२. जोशी रामभाऊ : २०१७ दुसरी आवृत्ती विदेश दर्शन. यशवंतराव चव्हाण, पुणे, सुरेश एजन्सी, पृष्ठ क्रमांक ७१

३. तत्रैव, पृष्ठ क्रमांक २३९

४. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ११४

५. तत्रैव, पृष्ठ क्रमांक १७३

६. दुकळे प्रकाश : २०१२ यशवंतराव चव्हाण माणूस आणि लेखक, मुंबई, ग्रंथाली.


●●●



Scanned with OKEN Scanner

# आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणातील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका

**डॉ. ज्योती ज. व्हटकर**

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी

### प्रास्ताविक

महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांनी महाराष्ट्राला पुरोगामित्वाची एक नवी दिशा मिळाली. त्यांनी महाराष्ट्रातचं नव्हे तर देशाच्या राजकारणात देखील आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला.

शाहू, फुले, आंबेडकर यांनी महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचे वरदान दिले. त्याचं विचारांचा वारसा यशवंतरांवानी पुढे नेला. यशवंतराव केवळ राजकारणात रममाण होत नसत तर ते समाजकारणामध्ये ही रस घेत असत. किंबहुना ते राजकारण आणि समाजकारण या दोन्हींची सांगड घालून आपले विचार मांडत असत.

यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व विविध पैलूंनी नटलेले होते. त्यापैकी नेतृत्वगुण हा त्यांच्यातील महत्त्वाचा गुण. त्यांच्या नेतृत्वात राजकीय आणि सामाजिक असे दोन्ही बाबतचे भान सहज दिसत असे. अर्थात यापाठीमागे गौरवशाली वारसा होता तो महात्मा फुले, वि.रा.शिंदे, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा. त्यातूनच प्रबळ लोकनिष्ठा हे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे वैशिष्ट्य तयार झाले होते. यशवंतराव चव्हाणांनी राजकारण आणि समाज यांच्यात बळकटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला, त्यातूनच जातिअंतावर आधारित बहुजनवादी राजकारणाची दिशा निश्चित झाली. राजकारण आणि राजकीय नेतृत्व या संकल्पनेच्या पारंपरिकेतला छेद देवुन संकुचित स्वार्थापलिकडे जावुन राजकारण आणि नेतृत्वासाठी काही तरी प्रयोजन असले पाहिजे असा विचार महाराष्ट्राच्या समाजरचनेत रूजविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. नेतृत्वाची संकल्पना स्पट करताना ते म्हणतात की नेतृत्वाचा अर्थ नीट समजून घ्या. नेतृत्वाकरिता नियोजन असावे व कामाला वाहून घेणारा निष्ठावान शूर वीर असावा. महाराष्ट्राच्या स्वप्नपूर्तीसाठी मी आपणा सर्वांना हाक देत आहे. राजकारणाची संकल्पनाही ते स्पष्ट करतात. राजकारण म्हणजे केवळ कारभार करणे व निवडणुका लढविणे नसून समाजपरिवर्तनाचे ते एक प्रभावी साधन आहे. समाजक्रांती हेच आपल्या राजकारणाचे



Scanned with OKEN Scanner

...असले पाहिजे.

...निर्मिती पूर्व १९५६ मध्ये यशवंतराव चव्हाण द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. हा काळ महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत संवेदनशील होता. महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे या यशवंतरावांच्या वक्तव्यामुळे जनतेत प्रचंड संतापाची लाट उसळली होती. मात्र या पार्श्वभूमीवर त्यांनी जे स्पटीकरण दिले होते ते या कालखंडातील राजकीय नेतृत्वाने लक्षात घेतले पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात यशवंतरावांचा कस लागला असून श्रीपाद डांगे, एस. एम. जोशी असे दिग्गज नेते विरोधात गेले असताना यशवंतरावांनी धीराने तोंड दिले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबद्दल त्यांची भूमिका ही विकासाभिमुख होती. हे त्यांच्या पुढील वक्तव्यावरून स्पष्ट होते. राष्ट्रीय प्रवाहापासून महाराष्ट्र वेगळा राहिला तर आपल्या राज्याची प्रगती खुंटेल मात्र द्विभाषिक मुंबई राज्याचे त्यांनी कधीच समर्थन केले नव्हते हे विसरून चालणार नाही. १९५२-५६ या काळात मोरारजी प्रशासनाने संयुक्त महाराष्ट्राचा लढा अगदी निर्दयीपणे दडपून टाकण्याचा प्रयत्न केला होता. मुंबई राज्यात मराठी भाषिकांचा प्रचंड असंतोष होता व या पार्श्वभूमीवर यशवंतरावांनी व्दिभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रीपद स्विकारले होते. मी बंदुकीची एक ही गोळी न वापरता राज्य चालवणार आहे असे त्यांनी जाहीर केले होते. अशा पद्धतीने त्यांनी बेरजेचे राजकारण केले. याबाबत भाई माधवराव बागल यांचे एक विधान अत्यंत समर्पक असे वाटते ते म्हणतात - 'यशवंतराव तुमच्यात एक फार मोठा दोष आहे, तो म्हणजे तुम्ही कोणाचा द्वेष करत नाही.' तात्पर्य यालाचं बेरजेचं राजकारण म्हटले जाते.

सुसंस्कृतपणा, व्यक्तीद्वेषाचा अभाव, बेरजेचे राजकारण यावर आधारित राजकारणाला त्यांनी प्राधान्य दिले. आचार्य अत्रे यांनी सभागृहाला मच्छीबाजार हा शब्द वापरला होता. तेव्हा अत्रेंना एक महिन्याची सजा व ३०० रू. दंड झाला. मात्र यशवंतरावांनी अत्रेंची शिक्षा रद्द करायला भाग पाडले होते व केवळ दंड करण्याचे सांगितले. यशवंतरावांची ही भूमिका म्हणजे त्यांच्यामधील वरील गुणांचे दर्शन सहज घडवून देते. सामाजिक व राजकीय एकसंघ समाजाच्या उभारणीचे ध्येय बाळगूनचं आपण जीवनात वाटचाल केली पाहिजे हा त्यांचा संदेश आधुनिक राजकारणात खूप आवश्यक आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर द्वैभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती झाली. द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री



म्हणून १९५६ ते १९६० व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून १९६० ते ६२ अशी दोन वर्षे म्हणजे मिळून एकूण सहा ते सव्वा सहा वर्षे मुंबई राज्याचे मुख्यमंत्रीपद यशवंतराव चव्हाण यांच्याकडेचं राहीले. राज्याची सर्व सत्तासूत्रे त्यांच्याकडेचं आली. दोन वर्षाच्या मुख्यमंत्रीपदाच्या कालखंडात त्यांनी अल्पावधीतचं आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा स्वतंत्रपणे निर्माण केला. १९६० पूर्वी महाराष्ट्राच्या नेतृत्वाचा केंद्रबिंदू शहरी भागातील सुशिक्षित मध्यमवर्गाकडून ग्रामीण भागातील सामान्य माणसाकडे वळविला. महाराष्ट्राची जडणघडण अत्यंत विधायक आणि लोकाभिमुख पध्दतीने करण्यासाठी त्यांनी आपल्या राजकारणाची दिशा निश्चित केली आणि वैचारिक बांधणी करून कृतिशीलतेकडे आपले लक्ष केंद्रीत केले. त्यांनी साहित्य, शिक्षण, शेती, सहकार, कृषी इ. सारख्या अनेक प्रश्नाबाबत राबविलेल्या योजनांमधून यशवंतराव चव्हाणांचा आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमधील वाटा लक्षात येतो.

यशवंतराव चव्हाणांनी राजकारणाच्या माध्यमातून बहुजन समाजाला आत्मविश्वास दिला. सामाजिक परिवर्तन, महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगती आणि त्यासाठी समाजातील सर्व थरांतील लोकांना प्रोत्साहन देवून कामाची संधी उपलब्ध करून दिली.

मुख्यमंत्रीपदाची धूरा हाती घेतल्यानंतर त्यांच्यासमोर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाचा प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडून आला. यशवंतरावांनी या प्रश्नाबाबत सकारात्मकता दर्शविली पण इतर सदस्यांकडून याला विरोध झाला. या प्रश्नासाठी त्यांनी आपले मुख्यमंत्रीपद पणाला लावले व ई.पी.एस. सवलतीचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. वरील प्रसंगामधून यशवंतरावांची लोककल्याण्याची निष्ठा दिसून येते.

शिक्षणाबाबत ते अत्यंत दक्ष होते. किंबहुना शिक्षणाकडे बघण्याची त्यांची दृष्टी व्यापक होती. त्याच्या मते ज्ञानाची गंगा ही समाजाच्या खोलपर्यंत पोहोचली पाहिजे, म्हणजे ती कल्याणकारी सिध्द होते. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती जेवढी महत्त्वाची आहे, तेवढे शिक्षणही महत्त्वाचे आहे. शिक्षणातून व्यक्तीचा भावनिक विकास आणि अंत:करणाचा मोठेपणाही वाढला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. याचा अधिक खुलासा त्यांनी युगांतरमधील एका लेखात केला आहे. ते म्हणतात, मानवाचे मन शिक्षणाच्या संस्काराने संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनू शकत नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर एकसंघ समाज उभारणे हे यशवंतरावांपुढील



Scanned with OKEN Scanner

मोठे आव्हान होते. महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सोहळ्याप्रसंगी त्यांनी जे भाषण केले होते, त्यातून त्यांनी महाराष्ट्र धर्माची संकल्पना व्यक्त केली होती. त्यांनी माणसाची केलेली परिभाषा म्हणजे त्यांच्या व्यापक मानवतावादी दृष्टीकोणाचे प्रतिक समजले पाहिजे. जातीवादाच्या विखारी प्रचारापासून आपण महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर या विषयावर बोलताना ते म्हणत की, हे कार्य आपण एक दिवसात, एका रात्रीत करू शकणार नाहीत. त्यासाठी विचारी माणसांनी विचारपूर्वक प्रयत्न करायला हवेत.

महाराष्ट्र राज्याची निर्मितीनंतर हे राज्य मराठी माणसाचे होणार की, मराठा माणसांचे होणार असा प्रश्न माडखोलकरांनी यशवंतरावांना केला. या प्रश्नाला यशवंतरावांनी अत्यंत समर्पक शब्दात उत्तर दिले होते. ते म्हणतात, ''जोपर्यंत माझ्या हातात महाराष्ट्राच्या सत्तेची सूत्रे असतील, तोपर्यंत तरी निदान मी हे राज्य एका जातीचे मराठ्यांचे किंवा अन्य कोणत्याही जातीचे होवू देणार नाही आणि महाराष्ट्राच्या कल्याणाकरिता मराठा जातीत जन्माला आला म्हणून मला हटावे लागले तरी मी मागे पुढे पाहणार नाही. पण ही गोष्ट कदापि मी होवू देणार नाही.'' यशवंतरावांचे वरील वाक्य हे त्यांच्या सत्याग्रही समाजवादी वृत्तीचे प्रतिनिधित्व करणारे आहेत.

महाराष्ट्रात सामुदायिक नेतृत्वासाठी त्यांनी सहकार क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली. सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, सहकारी बँका, दूध डेअऱ्या इ. उद्योगांना त्यांनी प्रोत्साहन दिले. शेतकऱ्यांच्या आर्थिक विकास कार्यक्रमाकडेही त्यांनी विशेष लक्ष पुरविले.

यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाच्या दिशेबाबत संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील खंदे नेतृत्व एस.एम.जोशी म्हणतात की, यशवंतराव हे ब्राम्हणेत्तर चळवळीकडे न वळता बहुजन समाजासाठी त्यांच्या विकासासाठी लढले. बहुजन समाजाला शोषणमुक्त करायचे असेल तर त्यांच्यात आर्थिक सामर्थ्य देखील आले पाहिजे हे त्यांनी ओळखले. थोड्क्यात सर्व थरातील माणूस वर आला पाहिजे अशी यशवंतरावांची धारणा होती मात्र सत्ता असल्याशिवाय हे होत नाही. यशवंतरावांनी जनतेच्या हाती सहकाराचे आर्थिक साधन आणि पंचायती राजची राजकीय सत्ता दिली हे आपणाला नाकारून चालणार नाही.

१ मे १९६१ महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त तर त्यांनी जणु जाहिरनामाच प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी महाराष्ट्र एक आहे आणि कोणत्याही एका भागाची प्रगती व भरभराट ही दुसऱ्या एखाद्या भागास तोशीस लावुन होऊ शकणार नाही अशी महाराष्ट्राची धारणा आहे. निरनिराळ्या विभागाच्या गरजा, साधनसामग्री यांचा बरोबर अंदाज घेवून राज्याच्या हिताच्या दृष्टीने प्रादेशिक विषमता काढणे ही खरी आजची गरज आहे. मराठवाडा, कोकण, विदर्भ हे तीन विभाग अजुन अविकसित आहेत. यांच्या विकासासाठी आपली आर्थिक व सामाजिक न्यायावरील आपल्या श्रद्धेची कसोटी लागणार आहे. यापद्धतीने त्यांनी प्रादेशिक समतोलाबाबत आपला विचार मांडलेला होता.

### समारोप

यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे आणि कार्याचे अनेक पैलू आहेत. त्यांचे व्यक्तित्व बहुआयामी होते. त्यांच्याकडे कोणताही राजकीय वारसा नव्हता. व्यक्तिगत गुण हे त्यांच्या नेतृत्वाचे अधिष्ठाण तर प्रचंड लोकनिष्ठा हे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे वैशिष्ट्य होते. आपल्या ऋणानुबंधामध्ये ते लिहितात – 'लोक मला मोठे म्हणतात किंवा लोकमताच्या आरशात मी जेव्हा मोठेपणाचे प्रतिबिंब पाहतो तेव्हा अधिक अंतर्मुख होतो. पण मोठेपणाच्या व्याख्येत वैयक्तिक मोठेपणाला काही अर्थ नाही असे मला नेहमी वाटते. अधिकारावर असलेल्या माणसाला समाज (सामान्य लोक) मोठा म्हणतात, पण हे खरे मूल्य नाही. कारण यात खरेपणा कमी असतो. खरा मोठेपणा हा विचाराचा प्रगत परिणामाच्या मोठेपणाशी निगडीत आहे.' थोडक्यात स्वार्थापलीकडेही नेतृत्वाला काहीतरी अर्थ असला पाहिजे असा त्यांचा विचार होता.

### संदर्भ

१. गोळे भा.ल. : यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद
२. चव्हाण यशवंतराव : सह्याद्रीचे वारे
३. बागल माधवराव : यशवंतराव माझे गुरू, मी पाहिलेले यशवंतराव
४. भावे मधूकर : यशवंतराव ते विलासराव, मनोविकास प्रकाशन, पुणे
५. कायंदे पाटील गंगाधर : यशवंतराव चव्हाण, चैतन्य प्रकाशन, नाशिक
६. चव्हाण यशवंतराव : युगांतर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
७. चव्हाण यशवंतराव : ऋणानुबंध, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे

●●●



Scanned with OKEN Scanner

# यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार

प्रा.जी.पी. कांबळे

कॉमर्स विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

## प्रास्ताविक

यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षण, शेती, उद्योग, व्यवसाय, कृषी उद्योग, सहकार, पाटबंधारे, धरणे, विकेंद्रीकरण व दुग्धोत्पादन इत्यादी क्षेत्रात मोलाची कामगिरी तर केली आहेच. पण मुख्यमंत्री या नात्याने सर्व क्षेत्रावर लक्ष ठेवल्यामुळे सर्वांगिण विकासाचे ध्येय साकार झाले आहे. महाराष्ट्र विकासाच्या उच्च खरावर पोहचला यासाठी यषवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार बहुमोल ठरले. विविध आर्थिक संकल्पने विषयी त्यांचे काय मत होते, हे जाणून घेऊया

## आर्थिक विकास

जगातील प्रत्येक राष्ट स्वतःच्या विकासासाठी प्रयत्न करीत असते. मग ते विकसित असा की अविकसित असो. विकसित राष्ट्रापेक्षा अविकसित राष्ट्रात विकासाचे मार्ग कोणते असू शकतात या संदर्भात यशवंतरावानी पुढीलप्रमाणे आपले विचार मांडले आहेत तसे पाहिल्यास जगातच उत्पन्न व सुखसोयीच्या बाबतीत फार मोठी विषमता आहे ही विषमता कमी करण्यासाठी उपाय शोधून काढणे हीच काळाची गरज आहे. असे त्यांचे मत होते.

अविकसित राष्ट्रांनी आर्थिक विकासासाठी नियोजनाला महत्त्व दिले पाहिजे. तसा प्रयत्न भारतामध्ये करण्यात देखील आला. अविकसित राष्ट्रे कृषिप्रधान असतात. अशा राष्ट्रांचा आर्थिक विकास शेतीवर अवलंबून असतो. म्हणून अशा राष्ट्रात शेतीची उत्पादन क्षमता वाढविण्यावर भर दिला पाहिजे. व जमिनविषयक सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. यासाठी जमीन धारणेवरमर्यादा घातली पाहिजे असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. याही पेक्षा कृषी उद्योगाचा विकास करणे हा आर्थिक विकासाचा मुख्य मार्ग आहे. अविकसित राष्ट्रांनी आर्थिक विकासासाठी सुरूवातीच्या काळात तरी निरनिराळ्या उद्योगद्यांची समतोल वाढ करण्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. परंतु त्यासाठी अनियंत्रित आर्थिक स्वातंत्र्याचा वापर करता कामा नये. कारण असे केलेल्या देशामध्ये समतेऐवजी विषमता वाढीस लागेल असे. यशवंतराव चव्हाण यांनी प्रतिपादन केले.



Scanned with OKEN Scanner

अविकसित देशात भांडवल संचय कसा करावा याचा हा महत्वाचा प्रश्न असतो. मनुष्यबळ ही अविकसित राष्ट्रांची मोठी संपत्ती आहे. आर्थिक विकासासाठी लागणाऱ्या भांडवल ऐवजी मनुष्य बळासारखा लागणाऱ्या वापर करण्याचा प्रयत्न केल्यास रोजगाराच्या संधी वाढून लोकांची खरी शक्ती वाढते व जीवनमान सुधारण्यास मदत होते. अविकसित देशात मोठया प्रमाणावर उद्योग धंदे व औद्योगिक प्रकल्प सुरू करण्यात शासनाचा पुढाकार असावा असे यशवंतराव चव्हाण यांनी प्रतिपादन केले.

**शेती संबंधीचे विचार**

यशवंतराव चव्हाण यांनी शेती संबंधित जे विचार मांडले आहेत. त्यात शेतीवरील मालकीचा प्रश्न, भूमिहिनांचा प्रश्न, शेती विकासाचा प्रश्न, शेतीच्या आधुनिक करणाचा प्रश्न, शेती शिक्षणाचा प्रश्न इत्यादीचा समावेश होतो.

**उद्योगासंबंधीचे विचार**

यशवंतराव चव्हाण यांनी आर्थिक विकासाच्या दृष्टीने शेती विकासाला जेवढे महत्व दिले आहे. तेवढेच देशातील उद्योगधंद्याच्या विकासाला दिले आहेत. यामध्ये ग्रामीण भागाचे औद्योगिकरण, समतोल विकास करणे, नवीन तंत्राचा वापर करणे आर्थिक नयोजन करणे, व्यवस्थापनात कामगारांना संधी देणे याशिवाय कामगारांना प्रशिक्षण दिले पाहिजे. कारखानदारांना आवश्यक तेसहाय्य केले पाहिजे. संयुक्त औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्यात यावी औद्योगिक विकासाचा मास्टर प्लॅन तयार करण्यात यावा असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते.

**सहकारासंबंधी विचार**

यशवंतराव चव्हाण यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सहकाराची तत्वेच महत्वाची ठरतात असे सांगितले आहे, कारण सहकारामध्ये देशाचा आर्थिक विकास करण्याची शक्ती आहे. यादृष्टीने सहकाराला आर्थिक विकासात महत्त्व आहे.

**समाजवादासंबंधीत विचार**

समाजवादाचा अवलंब करून देखिल देशाची आर्थिक स्थिती सुधारता येते असे यशवंतरावांचे मत होते. परंतु समाजवाद हा लोकशाही मुद्यावर आधारित असला पाहिजे. भारतातील परिस्थिती लक्षात घेऊन जगातील इतर राष्ट्रांनी कशी प्रगती केली हे लक्षात आणले पाहिजे. समाजवाद आणण्यासाठी सार्वजनिक क्षेत्र विकासित झाले पाहिजे. सार्वजनिक क्षेत्राव्दारे लोकांना कल्याण अधिक होते. सर्व समाजातील लोकांना सारखी वागणूक समान संधी देणे हा समाजवादाचा मुख्य उद्देश असतो.



**समारोप**

यशवंतराव चव्हण यांच्या आर्धिक विचारात त्यांनी देशातील सर्व क्षेत्रावर लक्ष ठेवल्याने सर्वांगिन विकासाचे ध्येय साकारणे शक्य झाले आहे. यशवंतरावानी अविकसित राष्ट्रांनी आर्थिक विकासासाठी नियोजनाला महत्व दिले पाहिजे अविकसित राष्ट्रात शेतीला महत्व असते तसेच कृषी उद्योगाचा विकास करणे हा आर्थिक विकासाचा महत्वाचा मार्ग आहे असे म्हटले. याशिवाय यशवंतराव चव्हाण यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सहकाराला महत्व दिले आहे. समाजवादासंबंधित विचारातून समाजातील लोकांचे कल्याण अधिक होते. अशा दृष्टीकोनातून यशवंतराव चव्हाणांनी आपले आर्थिक विचार मांडलेले आहेत.

**संदर्भ**

१. यशवंतराव चव्हाण : नवमहाराष्ट्राचे शिल्पकार : डॉ. जनार्दन वाघमारे
२. आर्थिक विचारांचा इतिहास : भोसले-काटे
३. यशवंत संस्कृती : विलास फुटाणे
४. महाराष्ट्राच भाग्यविधाते : यशवंतराव चव्हाण : डॉ. अशोक नाईकवाडे
५. साधना साप्ताहिक, १७ मार्च २०१२

●●●



Scanned with OKEN Scanner